55/५

महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र.३४/प्रनिप्रा/310

दिनांक : 24 SEP 2020

## बैठकीचे इतिवृत्त

मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, **दिनांक १७ सप्टेंबर, २०२० रोजी दुपारी ०३:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या १७ व्या बैठकीचे (Video Conference) इतिवृत्त,-

सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते,-

१) **डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु,** .... सदस्य
डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे रायगड

२) **प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर,** .... सदस्य
सदस्य तथा कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

३) **डॉ. के.डी.चव्हाण,**
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

४) **डॉ. अभय वाघ,** .... सदस्य
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

५) **श्री. पंकज कुमार (भा.प्र.से.),** .... सचिव
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य.

१) डॉ. विश्वजित माने, सदस्य तथा सदस्य सचिव व महासंचालक, महाराष्ट्र कृषि विषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे २) डॉ. धनराज माने, सदस्य तथा संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. हे सदस्य वैठकीस सहभागी झाले नव्हते, त्यांना तशी परवानगी देण्यात आली.

२४/९/२०

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य



Scanned with CamScanner

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या **दिनांक १७ सप्टेंबर, २०२०** रोजीच्या बैठकीचे विषयनिहाय इतिवृत्त खालील प्रमाणे आहे -

| विषय क्र. | विषय | कार्यवाही |
|---|---|---|
| १ | दि.०९ जुन २०२० रोजी झालेल्या बैठकीचे (VC) इतिवृत्त सादर करणे. | प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि.०९ जुन २०२० रोजी झालेल्या बैठकीच्या ईतिवृत्ताची नोंद घेण्यात आली. |
| २ | मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ९ जुन २०२० रोजीच्या बैठकीतील इतिवृत्तानुसार घेण्यात आलेल्या निर्णयाप्रमाणे कार्यवाहीचा (Action Taken Report) अहवाल. | अ. दि. ९/०६/२०२० रोजीच्या बैठकीच्या ईतिवृत्ताची नोंद घेतली. ईतिवृत्तातील निर्णयाप्रमाणे त्वरीत कार्यवाही करावी.<br>आ. मे. कल्प टेक्नोलॉजीस प्रा.लि., पुणे यांनी सार पोर्टल संदर्भात राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षास दि.१९/०९/२०१९ रोजी कायदेशीर नोटीसीद्वारे रु.३८,४१,६४,४६४/- नुकसान भरपाईची मागणी केलेली आहे. तसेच मे. कल्प टेक्नोलॉजीस प्रा.लि., पुणे यांनी दि.०५/०६/२०२० रोजी प्रलंबित देयकासंदर्भात या कार्यालयास नोटीस दिलेली आहे. या संदर्भात पुरवठादाराकडुन उक्त नोटीसी रितसर मागे घेतल्यानंतर मे. कल्प टेक्नोलॉजीस प्रा.लि., पुणे यांच्या प्राप्त देयकांबाबत मा. प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी दि.०९/०६/२०२० रोजी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे अंमलबजावणी करण्यात येईल, असे ठरले.<br>इ. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी तांत्रिक समिती त्वरीत गठित करुन, २० टक्के उर्वरित रक्कम पुरवठादार यांना अदा करण्याबाबत समितीचा अहवाल लवकरात लवकर सादर करण्याचे निर्देश दिले.<br>ई. राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षांतर्गत घेण्यात येणा-या परीक्षेच्या कामी देण्यात येणा-या मानधनाबाबत गठित करण्यात आलेल्या भोसले द्विसदस्यीय समितीचा अहवाल त्वरीत सादर करण्यात यावा.<br>उ. तथापि, वरील बाबींचा विचार करता प्रवेश नियामक प्राधिकरणाने यापुर्वी घेतलेल्या निर्णयानुसार देयके पारित करताना पुरवठादारांनी केलेले काम समाधानकारक पुर्ण केल्याची खात्री करुन तसेच विहीत कार्यपद्धतीचा अवलंब करुन अदा करण्यात यावी. |
| ३ | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील एम.बी.ए. अभ्यासक्रमाच्या | शै. वर्ष २०२०-२१ मधील एम.बी.ए अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी दि.१४ व १५ मार्च २०२० रोजी घेतलेल्या एम. बी. ए./ |



२४/९/२० (जे. पी. डांगे) अध्यक्ष प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य

Scanned with CamScanner

| विषय क्र. | विषय | कार्यवाही |
|---|---|---|
| | सामाईक प्रवेश प्रक्रियेबाबत. | एम.एम.एस. सामाईक प्रवेश परिक्षेचा निकाल २३ मे, २०२० रोजी घोषित करण्यात आला.<br>उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून एम.बी.ए. अभ्यासक्रमाकरिता प्रवेश प्रक्रियेचे नियम दिनांक ०९/०७/२०२० रोजीच्या अधिसुचनेद्वारे प्रसिद्ध करण्यात आले आहेत. परंतू या अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेकरिता पात्रता निकष निश्चित न झाल्यामुळे सदरील अभ्यासक्रमाची माहिती पुस्तिका तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्याकडून प्राधिकरण/सीईटी कक्षास अद्याप प्राप्त झालेली नाही. त्याचप्रमाणे विविध विद्यापीठांचे पदवी अभ्यासक्रमाचे निकाल घोषित झाले नसून एमबीए अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पदवी परिक्षेचे निकाल आवश्यक असल्याचे सदस्य तथा संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी नमूद केले. सद्यस्थितीमध्ये माहे ऑक्टोबर २०२० च्या दुसऱ्या आठवडयात प्रवेश प्रक्रिया सुरु करण्याचे प्रस्तावित असल्याचे आयुक्त, रासाप्रपक तथा सक्षम प्राधिकारी यांनी सांगितले.<br>त्यास प्राधिकरणाने सहमती दर्शविली. |
| ४ | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील एमएचटी-सीईटी-२०२० ही सामाईक प्रवेश परीक्षा. | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, कृषि शिक्षण पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षामार्फत घेण्यात येणा-या एमएचटी-सीईटी-२०२० या सामाईक प्रवेश परिक्षेच्या वेळापत्रकांमध्ये कोविड - १९ च्या प्रादुर्भावामुळे वेळोवेळी बदल करण्यात आले होते. तसेच या परिक्षेकरिता संबंधीत विद्यार्थी/पालक यांच्या विनंतीनुसार अर्ज भरण्याकरिता दिनांक ७ व ८ सप्टेंबर २०२० या कालावधीमध्ये अंतिम मुदत देण्यात आली होती.<br>सद्यस्थितीमध्ये उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.०४/०९/२०२० रोजीच्या पत्राने ०१/१०/२०२० ते २०/१०/२०२० या कालावधीमध्ये एमएचटी-सीईटी-२०२० घेण्याकरिता शासनाने सहमती दिली आहे. त्यानुसार सीईटी कक्षाच्या दिनांक ०९/०९/२०२० रोजीच्या पत्रान्वये वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आलेले आहे. सदर कालावधीमध्ये सामाईक प्रवेश परिक्षा घेण्याच्या दृष्टीने योग्य ती खबरदारी घेण्यात येत आहे. या परिक्षेसाठी उमेद्वारांची संख्या जास्त असल्याने तालुका स्तरावर ऑनलाईन परिक्षेची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. सदरील परिक्षा मे. टी.सी.एस. प्रा.लि., मुंबई यांच्या मार्फत महाराष्ट्रातील एकुण १९० केद्रांवर घेण्यात येणार असून PCB व PCM एमएचटी-सीईटी-२०२० करिता एकुण |



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

Scanned with CamScanner

| विषय क्र. | विषय | कार्यवाही |
|---|---|---|
| | | ५,४२,४३० उमेदवारांनी सीईटी कक्षाकडे नोंदणी केलेली आहे, असे आयुक्त यांनी सांगितले.<br>याप्रकरणी बैठकीमध्ये सखोल चर्चा करुन एमएचटी-सीईटी-२०२० परिक्षा घेण्याबाबत प्राधिकरणाने खालीलप्रमाणे सुचना दिलेल्या आहेत.<br>१. कोविड-१९ च्या संदर्भात शासनस्तरावरुन वेळोवेळी देण्यात आलेल्या सुचनांचे पालन करणे व त्याअनुषंगाने योग्य ती काळजी घेणे.<br>२. परीक्षा केंद्रावर कोविड-१९ आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात याव्यात.<br>३. प्राधिकरणाच्या सदस्यांनी परिक्षा केंद्रावर भेट देऊन, परिक्षेबाबत केलेल्या उपाययोजनांची आवश्यकतेनुसार माहिती घ्यावी.<br>४. परीक्षा केंद्रावर कायदा व सुव्यवस्था विषयक उपाययोजना करण्यात याव्यात. |
| ५ | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये ज्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा झालेल्या नाहीत, अशा अभ्यासक्रमांच्या परिक्षेसंदर्भात पुढील कार्यवाही. | शै. वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणा-या ज्या सामाईक प्रवेश परिक्षांचे वेळापत्रक अद्याप प्रसिद्ध करण्यात आलेले नाही अशा उर्वरित १३ सामाईक प्रवेश परिक्षांबाबत प्राधिकरणाला माहिती देण्यात आली. या सर्व सामाईक प्रवेश परिक्षा मे. आयबीपीएस, मुंबई यांच्या मार्फत घेण्यात येणार आहेत. कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे यापरिक्षेच्या वेळापत्रकामध्ये सुद्धा वेळोवेळी बदल करण्यात आलेले होते. या सर्व परिक्षांकरिता संबंधीत विद्यार्थी/पालक यांच्या विनंतीनुसार अर्ज भरण्याकरिता दिनांक ७ व ८ सप्टेंबर २०२० या कालावधीमध्ये अंतिम मुदत देण्यात आली होती.<br>या परिक्षांकरिता नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची सामाईक प्रवेश परिक्षानिहाय आकडेवारी **प्रपत्र - अ** मध्ये देण्यात आली आहे. |
| ६ | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये पदव्युत्तर वैद्यकीय / दंत अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिये दरम्यान प्राप्त झालेल्या तक्रारी संदर्भात. | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये पदव्युत्तर वैद्यकीय / दंत अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिये दरम्यान प्राप्त १२ उमेदवारांच्या तक्रारींचा गोषवारा **प्रपत्र - ब** मध्ये देण्यात आला आहे.<br>याअनुषंगाने प्राप्त तक्रारींबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडून व संबंधीत जात पडताळणी समितीकडून तपासणी अहवाल मागविण्यात यावा. सदरचा तपासणी अहवाल प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत निर्णयासाठी ठेवण्यात यावा.<br>शै. वर्ष २०२०-२१ मध्ये पदव्युत्तर वैद्यकीय / दंत |



२५/९/२०
(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

Scanned with CamScanner

| विषय क्र. | विषय | कार्यवाही |
|---|---|---|
| | | अभ्यासक्रमामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना अधिनियम, २०१५ च्या तरतुदींनुसार प्राधिकरणाची मान्यता देण्याबाबतची प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी संबंधीतांना कार्यालयीन स्तरावर मार्गदर्शक सुचना देण्यात याव्यात, असे प्राधिकरणाने निर्देशित केले. |
| ७ | मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे. | व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शै. वर्ष २०१८-१९ पुर्वी प्रवेश घेतलेल्या काही विद्यार्थ्यांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची अद्याप मान्यता प्रदान करण्यात आली नाही. अशा महाविद्यालयांचे प्रस्ताव प्राधिकरणाकडे प्राप्त होत आहेत. अशा प्रकरणांपैकी प्रिन्सीपल के. पी. मंगळवेढेकर इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट अॅन्ड रिसर्च, पुणे या संस्थेच्या शै. वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ च्या प्रवेशांना प्राधिकरणाने मान्यता दिली.<br>उर्वरित ३३ प्रकरणांबाबत अधिनियमातील तरतुदीं, प्रवेश नियम, शासन निर्णय, न्यायालयीन आदेश इ. प्रमाणे तपासणी करुन वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.<br>तसेच शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमांत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांबाबत प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या निर्णयानुसार त्रुटी पुर्ततेचे प्राप्त होणारे प्रस्ताव अधिनियमातील तरतुदीं, प्रवेश नियम, शासन निर्णय, न्यायालयीन आदेश इ. प्रमाणे तपासणी करुन पुढील कालावधीत अध्यक्षांकडे मान्यतेसाठी सादर करण्याचे प्राधिकरणाने निर्देश दिले. |

वरीलप्रमाणे विषयनिहाय चर्चा झाली. प्रवेश प्रक्रियेच्या कार्यक्रमाच्या संदर्भात आपली मते सदस्यांनी मांडावी असे मा. अध्यक्ष, यांनी सुचित केले असता प्राधिकरणाच्या सर्व मान्यवर सदस्यांनी कोविड - १९ च्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या लॉकडाऊन कठीण परिस्थितीत राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षाने शै. वर्ष २०२०-२१ वर्षाच्या पदव्युत्तर वैद्यकीय व दंत प्रवेश प्रक्रियेचा कार्यक्रम राबविला, तसेच इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परिक्षा व प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी परिस्थितीनुसार करत असलेली कार्यवाही प्रशंसनिय व कौतुकास्पद असल्याचे नमूद करुन राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षास धन्यवाद दिले.

**(जे. पी. डांगे) भा.प्र.से.**
**अध्यक्ष,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण तथा**
**माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य**

दिनांक २१/०९/२०२०

D:\MUKTA\MINUTES 2020\Draft Minutes_ARA-17 September 2019.docx

Scanned with CamScanner